॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone : (02462) 215525
Fax : (02462) 215572

**DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT**

Website: srtmun.ac.in
E-mail: dsd@srtmun.ac.in

जा.क्र./वि.वि.वि./२०२२–२३/302

दि. १७/०३/२०२३.

प्रति,

मा. संचालक,

सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : विभाग तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे बाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठामध्ये जी प्राधिकरणे अस्तित्वात आली आहेत, त्यापैकी कलम २६ नुसार विद्यार्थी विकास मंडळ हे एक प्राधिकरण आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६ (२)(ख) नुसार विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी आणि त्यास अटकाव करण्यासाठी निरनिराळे मार्ग व साधन उच्चतर प्राधिकरणांना सुचविण्यासाठी विद्यापीठामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष असेल असे निर्देशित केले आहे. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाजविषयक कार्यकारी यंत्रणा ही, विद्यापीठ अनुदान आयोग (तक्रार निवारण) विनियम, २०१२ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणतेही विनियम यांच्या तरतुदीनुसार तयार केलेल्या परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल, असे नमुद केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंतर्गत सन २०१९ चा एकरूप परिनियम ५ मधील ५(१) नुसार विद्यापीठ विभाग बाबतीत सर्व तक्रारी या, सर्वप्रथम विद्यापीठ विभाग तक्रार निवारण कक्षाला उद्देशून करण्यात येतील, असे म्हटले आहे. यानुसार विद्यापीठ विभाग तक्रार निवारण कक्ष पूढील सदस्यांनी मिळून बनलेला असेल.

(क) विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा प्रमुख — अध्यक्ष

(ख) कुलगुरूनी नामनिर्देशित करावयाचा, विद्यापीठ विभागाच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थेच्या बाहेरील प्राध्यापक — सदस्य

(ग) विद्यापीठ विभागाच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थेच्या प्रमुखाने नामनिर्देशित करावयाचा, तक्रार निवारण यंत्रनेमध्ये तरबेज असणारा अध्यापक — सदस्य ............................... सदस्य सचिव.

सन २०१९ चा एकरूप परिनियम ५ मधील ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार सदस्यांचा पदावधी दोन वर्ष इतका असेल. सन २०१९ च्या उपरोक्त एकरूप परिनियमानुसार आपल्या विद्यापीठ विभागात तक्रार निवारण कक्षाची स्थापना तात्काळ करण्यात यावी व अहवाल लेखी स्वरूपात संचालक, विद्यार्थी विकास विभाग प्रस्तुत विद्यापीठ यांच्याकडे सादर करावी, ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग